# रमेश पवार

म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. 232



# अनुभव



REFBK-0021929
REFBK-0021929

वि. क्र.
2322

२१८२८
६/१२/६६
३/०४

क्र. १०५४
सं. ६५

# अनुभव

रमेश पवार

2322
का.१५४
21929

REFBK-0021929
REFBK-0021929

मीरा प्रकाशन, अंधेरी.

# अनुभव

कविता संग्रह : रमेश पवार

प्रकाशक :

अशोक नारायण मुळे,
ठाकूरचरण कॉटेज,
राजमाता जिजाबाई नगर,
सहार रोड, अंधेरी (पूर्व),
४०० ०६९.

मुद्रक :

नारायण पाटील,
आल्प्स् प्रिंटींग प्रेस,
२०२, अलंकार इन्डस्ट्रिअल इस्टेट,
आरे रोड, गोरेगाव (पूर्व),
४०० ०६३.

© सौ. मनीषा पवार

प्रथम संस्करण ऑगस्ट सत्त्याहत्तर

मूल्य फक्त पाच रूपये

मुखपृष्ठ : सुनील कामत

एस्. पी, डॉ. लोहिया, वहिदा, मुम्मु, शौषन्ना, दादा कोंडके, आरती नि अजय, हाऊसिंग बोर्ड बिल्डींग नं. ३५, नवशक्ति, सिनेमा आणि सिनेमेवाले, वासुनाका, करंटा, होमसिक ब्रिगेड, गुरुदत्तवरचा लेख, वेश्यांचा मोर्चा. या सर्वांशी हृदयाची बांधिलकी ठेवलेल्या.

**भाऊ पाध्येस**

आपुन त्याला मानतो
कारन मी लिहितो ते फ्रिजमध्ये बिअरच्या
बाटल्या ठेवता यान्यात म्हनून हे मुलाखतीत
बिनधास्त तो सांगू शकतो म्हणून.

**–रमेश पवार**

**अनुभव** रमेश पवार

रमेश पवार **अनुभव**

म्हणतात.......
अनुभवाचं गुरुपण देतं शहाणपण
अपूर्ण माणूस अनुभवानं मिळवतो संपूर्णपण.
संपूर्ण माणसं मिळवतात देवपण
त्यांना पाहून जाणावे आपले रितेपण
हे रितेपण म्हणजे काय ?
असेल का ती जाणीव
की सफरींग्ज,
मॅच्युरीटी ऑफ थॉटस
की निव्वळ वेडेपण ?
पण अनुभव
असावाच आयुष्याच्या झोळीत
काखेत लटकावून फिरता येतं
मग जगाचे किंवा स्वःताचे का असेनात
'मला असं म्हणायच' हे मात्र म्हणता येतं.
अनुभावांची जात दोन
कडू आणि गोड
अनुभवाच्या लेजर बुकातल्या एन्ट्र्या
कडू गोड आठवणीचे आकडे भरायचे
आणि जीवनाची टोटल मारायची
काहीची जुळते काहीची टॅली होत नाही.
टोटल लावता लावता आयुष्य संपलेलं असतं

अनुभव असतात उरलेले, बदलेले—
मॅन टू मॅन, लाईफ टू लाईफ—
कधी तिरपे समान
आडवे तिडवे, समसमान
अनुभव म्हणजे तरी काय हो
अहो ! पिळवटलेलं आतडं पाहून
कळवळलेल्या काळजाने फोडलेला टाहो !

## तुम्हाला झालाय टी. बी.

तुम्हाला झालाय टी. बी.
तेव्हा इंजक्शने मारून घ्या
मास नसलेल्या दंडावर खुपसा
न मिळणाऱ्या औषधांच्या महागड्या बाटल्या आणा
'बी. चिमणलालची' मग्रूरी सहन करा.
टॉनिक घ्या.
मास मच्छी खा, जेवणावर फळें खा.
हवा पालट करा, पांचगणीला हवा टॉप असते.
लोकं तिथं हनीमून पण करतात
तुम्ही आयुष्य लांबवायला बघा.
नाही परवडत एवढा खर्च ?
ऑल राईट.
मग चाळीतल्या अंधाऱ्या खुराड्यात बसून
व्हरांड्यातून जाताना नाकावर रुमाल धरलेले शेजारी
आपली खोली ओलांडताना बघा.
मोकळ्या हवेसाठी गॅलरीच्या कठड्याला टेकून
मिलच्या भोंग्याचा धूर हाताने उडवत उभे रहा.
व्हरांड्यात खेळणाऱ्या बाबल्याला
'रे वायच, भुतूर ये बघू' त्याच्या आवशीने म्हटलेले ऐका
चाळीच्या मोडक्या जिन्याच्या काही पायऱ्या
कुठे तरी चालत निघून गेल्यात.
येणारा यम पाव्हणा धुडुमकम् जिन्यावर पडेल

ह्या विचाराने खूप खूप हसा.
हसताना ठसका लागला तर खोक खोक खोका
शरीराचा मोडका खोका रिपेर करण्यासाठी
इस्पितळ गाठा
तिथे प्रत्येक काट म्हणजे टी. बी. पेशन्टची एकेक कबर.
त्या कबर वार्डमध्ये स्वतःची कबर शोधा.
कबरीत बसून वार्डात लागलेला रेडीओ ऐका
'जीवनके सफरमे राही मिलते है बिछड जाने को'
हे गाणे ऐकून शेजारच्या कबरीबरोबर बोला.
ती कबर सांगेल..........
'लडका मेरा बाबु है हम तो मजदूर है
उसको हुआ है बच्चा.
देखनेको जी चाहता है, कोई आयाच नही.'
सकाळी उठताच ती कबर खाली झालेली बघा.
आणि स्नानघरात डरकाळ्यांनवर पेशन्टच्या पाय देऊन आंघोळ करून या
मजदूर गेलेला असतो
घरी नव्हे, उप्परवाल्याकडे . . .
त्याच्याकडे खूप हौसिंग फॅसिलिटी आहे.
आपलीही कबर खाली व्हायर्चीय
या विचाराने टरकून गेल्यावर
ड्युटीवरचा डॉक्टर राऊंडला येताच त्याला विचारा
'डागदर बाबु हमे क्या हुआ है!'
उत्तर येईल, 'कुछ भी नही'
'हम कब अच्छे होंगें'
'जल्दीही' त्याच्या भेजा कॉम्पुटर उत्तर देईल.

त्यावर खूप खूप हसा
गेले पंधरा दिवस कुणी बघायला आले नाही
हे आठवून पुन्हा खूप खूप हसा.
नवीन भरलेल्या कबरीने विचारलं
' क्या हुआ ? '
तर म्हणा
' काही नाही, मला दारिद्र्य झालंय '

## एकदा देवजी रडला होता

देवाने म्हणे जग केलं निर्माण
त्यात काय मोठी आर्ट
मातीचा गोल गोळा करायचा
तो उत्तर दक्षिणेला थोडा चेपायचा
झाली पृथ्वी.
तरी सुद्धा देवजी ग्रेटच
कुठल्याही सिझनमधल्या गणेश मूर्तिकारापेक्षा
त्याने त्या जगात माणूस मॉडेल तयार केलं
तो माणूस पृथ्वीवर वावरु लागला
गोरा झाला, काळा झाला.
काळेपणाला हसलेला, गोरेपणा पाहून गोरामोरा झाला
तो भांडवलदार झाला.
तो कॅम्युनिस झाला.
तो चोचॅलीस झाला.
तो सेवादलात गेला.
तो जमीनदार झाला.
त्याने बलात्कार केले.
त्याने भाद्रपदातल्या कुत्र्यांनाही लाजवले
त्याने दगड फेकले.
आगी लावल्या.
त्यानं ध्वज जाळले.
रेल्वेच्या रुळाच्या फिश प्लेट काढल्या

अपघातात तुटलेल्या हाताचे घडयाळ लांबवले
त्याने मुसलमान कापले, हिन्दू कापले
अस्पृशांना आयुष्यभर जाळले
त्या आगीवर आपली शिधा शिजवली
त्याने खोटी औषधे तयार केली.
आपली पोरं औषधाशिवाय मेली म्हणून देवाच्या नावानं रडला
तो खाल्या ताटात हगला.
आणि हगल्या संडासात उभ्या उभ्या संभोग घेतला.
तो ब्लिचिंग डिपार्टमेन्टमध्ये उकड्न निघाला.
खाणीमध्ये दफन झाला.
फायलीच्या पुरात वाहून गेला.
तो एव्हरेस्ट चढला. हाजीमलंग चढला.
त्याने यान बनवलं.
त्याने रांडवाडा बनवला
त्याने हिरोशिमा केला.
शिमगा केला.
त्याने पेडररोडवरून ढेकर दिले.
त्याने कचऱ्याच्या पेटीतून मासे शोधले
पंचपक्वान्न खाल्ल्यासारखे ढेकर दिले.
त्या माणसाने काय केले नाही ?
त्याने सर्व केलं. करायचे बाकीच उरले नाही.
देवाने तर नुसते जग निर्माण केले.
माणसाने तर त्या जगाला दुनिया दाखवली
देवाने पाहिलं आपलं हे फसलेलं मॉडेल
अजूनही पाहतोय पत्र्याच्या शेडमध्ये हारीने मांडलेल्या

गणपतीच्या कारखान्यात बसून
डोळे पेन्ट केलेले नाहीत, फायनल टच नंतरच होणार आहे.
त्या डोळ्यातून आता अश्रु गळणार नाही.
कारण देवजी एकदाच खूप रडला होता
इतका की त्याचा समुद्र झाला.

## प्रार्थना

हे परवर दिगार !
आम्ही तुझे बंदे आहोत.
आम्ही रोज नमाज पडतो
मक्का मदिनाची कधी न कधी हज घडावी.
म्हणून आम्ही अपुऱ्या पगारात तडफडतो
अगदीच नाही जमलं तर अजमेरला जाऊन खैरात करतो
कारण तूच आमचा पालनहार असा परवर दिगार
तूच सूर्याचा देतोस प्रकाश
तूच भागवतोस पाण्याने तहान
तुझ्या सूर्याच्या प्रकाशाने तापते वाळवंट
पण पोटात पाणी घेऊन फिरतो उंट
तुझ्याच कृपेने मध्यपूर्वेत आहेत तेलाच्या विहीरी
तुझ्याच कृपेने शोधती तिथे आमचे बांधव नोकरी
तुझ्याच कृपेने पडतो पाऊस
उगवतं धन धान्य
पाकिस्तानची क्रिकेट टीम स्ट्राँग आहे तुझ्यामुळे
कुराणे शरीफचं पावित्र्य आम्हाला हेच सांगत
अल्ला मियाँ है जगमे सबसे बडा
ना बाप, ना भैय्या, ना रुपैया
आता एकच प्रार्थना
आमची भेंडी बाजारातली चाळ झालीय जुनी
कधीही पडेल

म्हणून खाली करा म्हणते म्युनसिपालटी
या अल्ला! तुझ्या बंद्यांची चाळ नको पाडू देत
एवढं सगळं करतोस
मग हे काही तुला कठीण नाही.

# माता

माता कुंती, माता जिजाई
माता कुत्री, माता कोंबडी
माता रांड, माता डुकरी
या सर्व माता.
ह्या माता तर लय मोठ्या झाल्या राव
तुम्हास्नी म्हायत हाय एका वडारणीचं नांव ?
आपल्याला पण म्हायत नाय
पण ती बाय होती, तिच्याही मायेला साय होती
तिचही होतं पोट, त्याला म्हणत्यात टेमकं
तिचंही होणार होतं मूल
ही काय तिची भूल ?
हाय वे चा तिला शेजार
परदेशी पाव्हणा ती वस्ती पाहून होतो बेजार
म्हणून स्कूल ऑफ आर्ट वाल्यानी रंगवली झोपडी दोन चार.
झोपड्यावरचं पेंटिंग त्यावर पानाची पिचकारी
रंगदार इस्टमनकलरकी बस्ती, बॅनरचं पांघरुण
त्यात होती वडारांची वस्ती.
फाटेच्या पारी उठून मागायची भीक
सांजच्या पारी भाकरीचे शिळे तुकडे खायचे
उरलेले उन्हात सुकवून भैयाना द्यायचे.
भिकेने पोसायच्या म्हशी
नि उधारीच्या दुधाने बाळसवायची पिल्लावळ

उठवेना वडारणीला झाली फाटफटी
दादल्याच्या मर्दाईने ओझावली कटी.
त्यानं घातली काचकन लाथ
दणक्यानं आतलं प्वार रडलं आयशीच्या डोळ्यातून
उठून निघाली
शहराला सुंदर ठेवा म्हणून
हाय वे वर जाऊन आली माल रीचवून.
जो देगा उसका भला.
नही देगा उसका भी भला.
गरीबोंकी सुनो वो तुम्हारी सुनेगा
जिन्दगी और मौत च्या बॅनर ऐवजी
रोटी कपडा और मकानका बॅनर भी देगा
गात होती ती भसाडया आवाजाने
एच्. एम्. व्हीच्या पाळीव कुत्र्याच्या सुरानं.
कुणीतरी गाण्याला कंटाळलं
पांच पैसे रॉयल्टी देऊन मोकळं झालं
उन्हें तापली
पोटात कळ मारु लागली
मर्दाच्या मर्दाईची वेदना विव्हळू लागली
कळा दाबूनी चालत होती
पोटातल्या बाळाला, ' अजून चार म्हयनं थांब ' सांगत होती
आतला गोळा होता क्रांतीकारक
अस्तित्वासाठी तडफडत होता, देत वेदना भयकारक
मटकन बसली ती खाली
कळ तिला सहन न झाली

गोळ्याने धरतीवरी धाव घेतली
अर्धवट गोळा मांसाचा
त्याला रंगरंगोटी रगताची लालम लाल
स्कूल ऑफ आर्टवाल्यांनी न केलेली.
रस्त्यावर ती रडली, कळवळली,
कुणीतरी पासींग बाय दया म्हनाली..........
अरे ही तर भिकारीण रस्त्यावर नासवली.
पाहिलं तिनं त्या गोळयाला
नुसता मासाचा गोळा
अरं माझ्या बाबा ! हाक मारली त्या निर्जिव मासाला
हृदयाशी तिनं तो गोळा कवटाळला
आणि बॅनरवाल्या झोपडीचा रस्ता धरला
लंगडत, कण्हत, उसासे टाकीत.
रक्ताने थबथबलेल्या मांड्या साडीने पुशीत.
गोळा मात्र ती रस्त्यावर टाकत नव्हती
गोळा असला तरी तिच्या मातृत्वाची ती खूण होती.

त्या आहेत कन्ट्रक्टेड हटमेन्टस
हाऊसिंग बोर्डाच्या, मिडल इन्कम ग्रुपच्या
कुणी तरी बसमधून जाणारा,
रविवारी आइसक्रीम खाणारा
पुन्हा प्रपंच रेडिओवर ऐकणारा
पगाराच्या दिवशी फिश घरी नेणारा
तिथं रहात असतो.
बायकोशी इंग्रजी बोलत असतो.

आर यू. कॅरींग ग ?
यस ना पण............
बट आता व्हॉट ?
माय फिगर विल गेट स्पॉईल्ड ना !
ऑल राईट, क्युरेटिंग.

# बाबा

तो पुतळा उभा आहे, राहणार आहे.
उन्हात तापत, थंडीत कुडकुडत
त्याच्याच लेकरांसारखा..........
म्हाराचं शेबडं पोर बोट धरून बापाचं
त्याला बापाचं नांव न्हाय म्हायती !
बाप हा त्याला बाबाच
बाबाचा पप्पा डॅडी व्हायला
तो बाबा होता किती राबला
आणि एके दिवशी झाला पुतळा
बाबाने पोराला गेट वे दाखवला
पोराने तो बाहिने शेंबूड पुसत पाह्यला
मग आला बाबाचा पुतळा
बोट वर केलेला.
बाबा ! ह्यो कोन ?
—आपलं हरवलेलं सपान.
झुकव तुझी मान पोरा ह्यो होता महान.
बाबा ह्याला उन्हात लागली कां तहान ?
— लागती ना. पन आडाचं पानी मिळंना आपल्याला
तवापास्ना ह्यो इसारला त्याच्या तहानेला.
बाबा ! ह्यो उभा कशापाय ? उभं राहूनशान दुखत्यालं त्याचं पाय
— कायतरीच बोलतुयास पोरा !
इचार तरी कर जरा

ह्यो जर थकूनभागून बसला
तर बोधीचा सरल बहर, ठाव हाय तुला ?

बाबा........
— लवकर इचार पोरा, जगाचं वाळवंट लय तापाया लागलं
ह्यो बाबा कधी माझ्यापरीस रडतो काय ?
–होय पोरा
जवा तुझी आय जळली
तवा ह्याचं डोळं लय रडलं
नि मुंबय म्हनाली दव पडलं

## शववाहिनी

ती असते एक गाडी
मृत्युला मोबाईल करणारी
बरीच प्रेमळ ........ ..
वाहून अश्रू नेते
ते पाहून शव मात्र हादरते
मान हलवून नका रडू नका रडू म्हणते
भूलोकी आलेले यमदूत उचलण्या मर्त्यप्राणी
थकून भागून विसावाच्या क्षणीं
या गाडीखाली झोपत असतील ड्रायव्हर क्लिनरवाणी
असेल ओघळत त्यांच्या मिटलेल्या पापण्यातून पाणी
हिच्याचमधूनी जाती थोर सान मोठे लहान
हरवुनि बसलेले जगण्याचे भान
हिला सर्व प्रिय, नाही ठाऊक भेद
असो वेश्या, सुकेशा, कितीही बोलभाषा, पांढरपेशा
घ्या सामावून, पोचवा,
सुरू कराया अंत्ययात्रेचा खंत श्री गणेशा
किती मोठ काळीज....
पण तरी आहे पक्की कॉम्युनल मांयडेड
मुस्लीम होता डेड -----
मुस्लीम शववाहिनी
पारसी मरता लागूनी वेड.......
पारसी शववाहिनी

कां हा असा भेदाभेद तिच्या रक्तात
मंजूर नाही हे निधर्मी राज्यात
माणसानीच डोळ्यात घातलेले धर्माचे कुंपण
त्यावर माणुसकीचा सरडा मरुन पडलाय लोंबकळतोय
भूवर, तोंडातून त्याच्या रक्ताची शिंपण
धर्मनिष्ठ शववाहिनीला झाला एकदा अपघात
करूनी गेला घात
कुणाचा तरी, घरातल्यांचा, सग्यासोयऱ्यांचा
धर्मनिष्ठ शववाहिनीने थारोळ्यात पाडलेला मृत्यु
असेल हक्दार अग्यारीचा, कब्रस्तानचा, सिमेट्रीचा.
पण तो रक्ताचा रंग मात्र लालच होता
थारोळ्याचा काळपटच होता
आणि सरडा पुन्हा लोंबकळतच होता

## परसादाला सव्यांनी यावे

हॅलो लाऊड स्पीकर टेस्टींग
वण टू थ्री फोर वण टू थ्री फोर
'हॅलव ! हॅलव ! सत्य नारायनाच्या पुंजेला
सव्यांनी यावे.......
परसादाला येन्याची सव्यांनी करावी
सत्यनारायन पुंजा वर्स १७ वे'
खर्र ऽऽ खर्र ऽऽ खर्र ऽऽ
झूम बराबर झूम शराबी झूम
झूम झूम, फोरास रोड मे घूमघूम
रंडीके घागरेमे धामधूम
पम् पम् पम् पा फूऊ वॅक
काहे को साले रास्तेमे गंडीया हिलाके
चलते हो ? मरनेका है क्या ?
जाऊ दे हो डरावयरसायेब,
बिचारा शादीशुदा होंयगा
रांड बाजारात वासनकांड थंड
करायला आलाय थंड
वण टू थ्री फोर वण टू थ्री फोर
यु वान्ट मोअर ?
नेपाली सुजलेल्या डोळ्याची
अमेरिकन....... चामडीवर पुरळ उठलेली
घाटन कोल्हाटन, दे दनादन

‘ सर्व्यांनी परसादाला लायन लावावी
हॅलव ! हॅलव !
शूत–शूत–शूत......
परसादाला लायन लावावी
शूत अबे ये ना, सस्तेमे हय
लाजा ताजा – कोई न आयेला
अग चमेली साला कडका दिसतो
होना बानू, आनुभव पायजे म्हनतो
जाने दो चमेली रायटर होगा
चाय मंगा, इतने बरस होकर भी—
कडकेको नही पहचानती तू.
— पोऱ्या फडका मार,
खाया पिया कुछ नही सिर्फ गिलास फोडा
उसका बारा आना
पंखा चलाव और रेडव लगाव
विविध भारती, जवानोंके लिये जयमाला
गिऱ्हायकोंके लिए मालावाला मोटा कुल्प
बम् भोला
शिंगल चाय लाव और खारी.
साब तुमको मंगताय परी ?
जन्नतकी, मजबूत छाती की,
सस्ता माल, लाट का माल
कोई भी उठाव
कीमत चुकाव
और घरकी अवरतको भूल जाव

रेट ?
साडेतीन रुपया.
जन्नतमे साली मेंहगाई नही !
' एक परीकी, साडेतीन रुपियेमे ? '
आपनतो दो लेगा पांचमे
दो लेगा इसलिये कन्सेशनमे.
परसादाला सर्व्यांनी यावे
चलो साब लायन लगाव
खर्र ऽऽ खर्र ऽऽ खर्र ऽऽ
औरतने जनम दिया मर्दोंको
मर्दोंने उसे बाजार दिया
जब जी चाहा मचला कुचला
गुळगुळीत रेकॉर्ड
बुळबुळीत सेक्स
चला पायऱ्या चढा
वण टू थ्री फोर  वण टू थ्री फोर
नाधिं धिन्ना, नाधिंधिन्ना
छुम छुम छुम बाजे पायल मोरी
आजा चोरी चोरी
छुम छुम छुम छुम
वर्स सतरावे
खॅांक खॅांक खॅांक खॅांक
खॅांसी को हटानेको पेप्स खाव
खॉक खॉक खॉक.......
साली चमेली खॅांसने लगी

# नागडे पाय

सत्य नेहमी अनवाणी भटकतं.
काव्याकुटयातून, तापलेल्या डांबरी रस्त्यावरुन,
खिस्त गेला बेअर फूटेड,
हातगाडीवाला गाडी ओढतो नागड्या पावलांनी
तुकाराम गाथा इंद्रायणीत बुडवली जातांना
तुकाराम किनाऱ्यावर चपला घालून उभा होता काय ?
किंवा चपला घालायला........
त्याच्या पायात चपला होत्या काय ?
भंगी रस्ता झाडतांना दिसतात
त्याचे धुळीने माखलेले पाय
अरे जगात चाललय तरी काय !
सत्याचे नागडे पाय
हे सत्य........
बाटाच्या दुकानाजवळून जातांना
रडत असेल कदाचित
कदाचित लंगडा माणूस पाहून
आपण बेअर फूटेड हे दुःख जात असेल विसरून
त्या सत्याला एका महात्म्याने प्रश्न केला
का रे येडझवनीच्या सत्या !
कां तू अनवाणी चालला आहेस उन्हातून
सत्य म्हणाले क्षणभर थांबून
अरे महात्म्या !

हल्ली सर्वांच्या सोलमध्ये पुठ्ठा भरलेला
आहे म्हणून.

# शेक्सपिअर

गाडी भन्नाट धावत होती, भरलेली
जीव घेऊन धावणाऱ्या माणसासारखी
नुसती पळत होती ढुंगणाला चाक लावून
तिचं नावही चांगल डबलफास्ट
बॉम्बे सेंट्रल टू दादर, दादर टू बॅन्ड्रा
बॅन्ड्रा टू अंधेरी
तिला फुरसतच नव्हती
पण तिने असं धावायला नको
अवघडलेल्या अवस्थेत असं धावतं कां कुणी
तिची जड झालेली पावलं
दोन स्टेशनाच्या मध्येही थांबायला तयार नव्हती
तिने खाल्ला होता चर्नीरोडचा खारा वारा
वाटेतले खांब बाजूला होऊन वाट देत होते भराभरा
ग्रॅन्टरोडच्या मेखानने मावाकेकचा वास सोडून
तिची घरी परततानाची भूक टाकली होती चाळवून
तिचा तो भन्नाट वेग लोअरपरळचे मिलचे भोंगे
पहात होते भोकांड पसरून
दादर कंपनीकी चमेली
हा उद्‌बत्त्याचा आवाज
कानात टिपून ती म्होरं निघाली
तिच्यात भरली होती माणसं मुंग्यासारखी
खच्याखच

मुंगी असून पर्वताएवढं आयुष्य वाहणारी
कुणी बापट कुणी तापट
भांचोद धक्का कायकु मारता है, सीधा खडा रहो
कुणी शर्मा, वरमा कुणी भरमा
तर कुणी शरमिंदा वर मिंदा रामा शिवा गोविंदा
कुणाच्या तोंडात सिगारेट तर कुणाच्या कॉटनचे रेट
कुणाच्या तोंडात बसवलेला टाईप रायटर
आय डोन्ट केअर हं, व्ही ही सेज बरं
मी टूमारो लेट येणार म्हणजे येणार
कायतर म्हणे आय कम लेटली
सायब लेट येतात तेव्हा – ह्यांना मस्टर ठेवला पाहिजे
देन आय जस्ट वेन्ट आऊट फॉर....आपलं....हे....
गरीबोंकी सुनो वह तुम्हारी सुनेगा
गर्दीतही भिकेचे चान्सेस पाहणारा
त्यात होता, भिकाऱ्यांकडे भीक मागत
सर्व होते घामटलेले घामाने थबथबलेले
.... घामाच्या वासाचा दर्प छे बॉ
स्वतःच्या काखेत नाक खुपसल्यावर हवासा वाटतो
अनेक कारवांचा जॉइन्ट दर्प साला डोकं उठवतो
त्यात घुसला वांद्रयाच्या खाडीचा दर्प
भय्ये लोक असेच पादतात
मग इतर लोक काय सुगंधी पादतात ?
दादर कंपनीकी चमेलीसारखे ?
गद्ध्यासारखे जोक्स मारु नकोस
गाढवं कधी जोक्स मारतात ?

त्याऐवजी ती पॉलीटिक्समध्ये सिन्सिअरली भाग घेतात
जोक्स फक्त साहेबांनीच करायचे असतात
आपण त्या विनोदाला खूप हसायचं असतं
स्वतःला पत्रकार न समजता
निरनिराळ्या नावाची शरीर
कुणी पत्रकार कुणी चित्रकार
कुणी टुकार तर कुणी हस्तकलाकार
म्हणजेच पाकिटमार
गाडी त्या सर्वांना घेऊन धावत असते
तिच्या डोक्यावर लोक चढलेले असतात
देव आनंद सारखे........
कुनाला बी खांद्यापर्यंत चढवा
डोक्यावर नको ते मग आय घालतात
त्या गर्दीत कधीही आय न घातलेला
माणूस लोंबकळतोय
नांव त्याचं माहित नाही, नांवात हाय तरी काय ?
शेक्सपिअर दरवाजाला लोंबकळत असतो
त्यांच्या सेक्सपिरीअन लाईक मधून पैदा झालेली
मुलं घरी त्याची वाट पहात असतात
त्यांच्यासाठी पिशवीत असतो मेरवानचा मावाकेक
तो मात्र........
जीवनाच्या भट्टीत भाजून सुद्धा नीट न पकलेला
आयुष्याचा बेचव केक हमेशा चघळतो
क्वचित गोड आठवणी रवंथतो
ह्याच घर म्हणजे एक खांबी तंबू

पायातून लूझ
त्या तंबूतही गर्दी ट्रेनसारखी
सेक्सपिरीअनवाले रीझन दुसरं काय !
तंबुतल्या गर्दीत सुखाचा उंट शिरुच शकत नाही
म्हणून पटावर तिरपा चालू लागतो,
हा मात्र उभा असतो लटकत
कुणाच्यातरी पायावर पाय देऊन
आयुष्याची पंचेचाळीस वर्षं होऊन सुद्धा,
स्वतःच्या पायावर तो उभा राहू शकलेला नाही
गाडी धावत असते
त्याचं मन तिच्याही पुढे
गाडीची चाके ढुंगणाला
खांब होताहेत बाजुला
मात्र एक खटयाळ आडवा येतो
खांबावर मग खांब आदळतो
खांब बिचारा कोलमडतो
आणि तंबू ? त्यातले सेक्सपिरीअन ? आणि मोवाकेक ?
कोई गिर गया गाडी किंचाळली
पाचसो रुपिया जुर्मानाचा विचार न करता थांबली
हाशहुश करीत, मग आठवणीने चुकचुक करीत
ट्रॅकवर बाजुच्या पडलेला असतो
शेक्सपिअर.......
टू बी और नॉट टू बी च्या झेंगटातून सोडवलेला
गाडी थांबूनच राहते
डेड बॉडीच्या सोपस्काराला

फार वेळ चाललाय ड्रामा इन्टरव्हल
शेक्सपिअरला समजायला हवं हे
उकडतय.........
कारवांचा जॉईन्ट दर्प.........
गुदमरायला होतय.........
पंखे तर पावसाळ्यात सुरु होतात।
वर्षाचे आठ महिने गरगरुन उन्हाळ्यात सुटीवर
असतात.........
थबथबलेली शरीरं आंघोळ करीत असतात
क्या हो गया भाय ?
मरेले आदमी के वास्ते स्ट्रेचर लाने गये होंगे
मरेले को स्ट्रेचर और जिन्दाको तीरडी
फिर भी गाडी खडीच ती खडी
पुन्हा शांतता तोच दर्प अंगाची वाफ.........
असह्य — सगळे
सुसह्य — फक्त एक जीव
गाडी मात्र हलतच नाही
उकडतय — दर्प, फॅन मेलेत
कुणीतरी वैतागतो कुणीतरी मेलेला विसरुन
कुणाच्यातरी पायावर उभा रहात म्हणतो,
साला देरी हो रिया है।

फूटपाथ
खांब दिव्याचा
खाली भिकारी
चिरनिद्रीत
बेवारशी
नाक पुड्यांत
माशीच माशी
मृत श्रीमंतापाशी
गर्दी
नातेवाईकांची जशी
भिकारी
कधी मेला
कसा मेला
महत्त्वाचे म्हणजे
कसा जगला
खांबाचा दिवा
अंधार संपला तरी
उगाच जळतो  तसा
त्या खांबावर
सिनेमाचे
पोस्टर आहे
सपनोंका सौदागर

नाट्यसंमेलन
एक अपरिहार्य औपचारीकता
अध्यक्षपद म्हणजे संगित भाऊबंदकी
संम्मेलन भरवावं कुठं ?
इथं की तिथं !
हा दिवा मालवू की तो दिवा........
रंगभूमिच्या जुन्या पण मरू न शकलेल्या सेवकांचा
मानसन्मान, श्रीफळ, शाल त्यांच्या हाती
आयुष्याच्या संध्याछायेत उगाच पेटवलेली मिणमिणती पणती
तेलाचा नि वातीचा खर्च वाढतोय पण पेटवलच पाहिजे
पुसटत्या लांबट छांयांना अंधार पसरल्यावर
मिणमिणत्या प्रकाशात वाटचाल करता आलीच पाहिजे
सम्मेलनाच्या जेवणावळी, अल्पोपहाराचं अपचन
ढेकर, वर्दळ, ओळखी पाळखी मनन चिंतन
निव्वळ बटाटयाची चाळ
त्यातले अध्यक्षीय भाषण ही एक वटवट
रंगभूमीसाठी यंत्र करा, त्यंव करा, घिस करा, दॅट करा
हे करा, ते करा, अमुक करा तमुक करा
हे सर्व मन नसलेल्या कानांनी ऐकायचं
नि कान नसलेल्या मनानी साठवायचं
पुन्हा मग ढेकर देत
पाटया टाकलेले नाटयप्रवेश थिजलेल्या डोळ्यांनी पहायचे,

भरल्या पोटी परततांना रस्त्यावरुन
रस्त्यावरचा एक शून्य बाजीराव हाकलवायचा
साले संम्मेलनाच्या ठिकाणी पण भीका मागतात
असं म्हणून........
संम्मेलनाचा खर्च मनात चाचपडायचा
मागून येणारा आवाज फाटक्या झोळीच्या गोल घुमटात
निनादतो
कानावर आघात करतो
कारण तो आवाज आवाजत असतो
अहो मी पण एकेकाळी रंगभूमीचा नट होतो.

# क्षमा

छान किती दिसते फुलपाखरू
निळा जांभळा रंग मनोहर
छान किती दिसते फुलपाखरु
उडतय भिरीभिरी, एखाद्याच्या नॉटी मनासारखं
माळ्याच्या खोपटापासून गुलाबाच्या रोपटयापर्यंत
मध्येच उंच आकाशात
फुलपाखरू – जशी रात्री आकाशाच्या बागेतून
पळ काढून निघालेली तारका
दिवसा वाट चुकलीय म्हणून भिरभिरतेय
कुठं तरी विसाव्याचं ठिकाण शोधतेय
बागेत आहे फुललेला दिमाखदार गुलाब
कुठल्यातरी शायराच्या डोळ्यांनी पाहिलेले
एक मायूस गुलाबी ख्वाब
ते स्वप्न प्रसन्न बोलावू लागलं भिरभिरणाऱ्या स्वप्नाला
ये विसाव्याला, मधु चाखायला आणिक.......
हळूच ओठांची गुलाबी लिपस्टिकि
पंखावर उमटवायला
नाजुक फूल, नाजुक फुलपाखरु
फुलाघर बसताच.......
दवबिंदूनी आनंदाश्रू ढाळले
पण हाय.......
एक पाकळी तुटून पडली

कळ मस्तकी गुलाबाच्या आली
धरती आई ग ! शब्द उमटले गुलाबी कळवळून
फुलपाखरु चिमुकले दुःखी झाले
त्याच्या आकाशाएवढ्या मनात खंत निर्माण झाली
कसं करू मी सांत्वन या गुलाबाचे
तुटून पडलेल्या पाकळीची खंत.......
जमले अश्रू फुलपाखराच्या ईवल्याशा डोळ्यात
' अरे गुलाबा ! क्षमा कर मला
माझ्यामुळे तुझं काळीज तुटून पडलं
काय करु मी कशी क्षमा मागू ?
पाहिजे तर हा घे माझा पंख
पाकळी बद्दल
आता तरी करशील ना क्षमा ?

* * * * *

एक आंधळा उभा रस्त्यावर
मोटार येतेय भिरभिरत अंगावर
अरे हटो, अंधा है क्या ?
गाडी सिधी अंगावर,
उडून गेलेला भिकारी उडालेल्या मनासारखा
कळवळतो ' आई ग ! ' पडल्या पडल्या
मोटारवाला बाहेर येतो
आंधळ्याला गॉगल लावून पहातो
तेवढाच सोफिस्टिकेटेडनेसपणा

कशी क्षमा मागू ह्या डोळ्यात शिरलेल्या
अंधाराच्या मालकाची ?
माणस जमलीत – पिंडी पडणारच
अंधेके माफिक गाडी चलाता है, असं म्हणणारच
मग ?

You see, I didn't know that........
Any way, I am sorry
हे घे पांच रुपये Ok ?
मोटार जाते भुरभुरत
गर्दी हटते पिरपिरत
आंधळा एकटा उरतो थरथरत.
नोट चाचपडतो नि आकार चाचपडून
कळते त्याला अपघाताची किंमत पांच रूपये
आंधळा डोळसपणे म्हणतो
काय तरी रीत झाली क्षमेची
हल्ली पांच रूपये फेकून क्षमेचे तोंड बंदकरता येते

# वहिवाट

पाहिली तिने एक संपलेली पहाट
नि धरली वाट
पोटापाण्याची शोधण्या वहिवाट
ही वहिवाट म्हणजे एक खाट
त्यावर टेकायची उघडी पाठ
मांड्या पसरुन वाहून घ्यायचा वीर्याचा पाट
वहिवाटीनं रगडलेली पाऊलवाट
पतिव्रतेच्या जनाज्यासारखी
सजवायची शेज, भूषवायची मढी मुर्दाडाची
लिंपणं करायची आयुष्याच्या भगदाडांची
भरायची खळगी पोरानवऱ्याची
शेजेवर पाठ, कुदणारी पहाट
कण्हणारं ओटीपोट, धंद्यात असायचीच की खोट
दारावरची टकटक नेहमीची उतावीळ तिची खोड
पण आजची तर न्यारीच. तैयार नसलेली टकटक
कोन है बे ?
इन्सपेक्टर.
बापरे रेड आया है खुब्बुसुब्बु !!!!
तिने दरवाजा उघडला
दारात एक सिवीलियन पाहिला
काय को धंदेके वखत रेड डालता है
हम बेचारी कैसाबैसा पेट पालता है

सिविलिअनच्या कपाळावरचा सांस्कृतिक घाम !
त्याच्यात शेंदूर विरघळला
तिला कळला, अरे आज तर शनवार उजाडला !
मारोतीचा भक्त रांडेच्या दारात आला
बैठनेका है क्या ?
नहीं, पूछनेका है
माफ करना हमको वोट नहीं देनेका है.
रंडिके वोटसे कभी दुनियाका भला होता है ?
नही नही हो हम राशन इन्सपेटर है
तुम राशन देगा ?
हा
हमारा पेट भरेगा ?
हा
फिर ये धंदा छोड देगा
मोफतमे क्यो हम चमडी बरबाद करेगा
नही देवीजी !
मी देवीजी ! आणि मग संतोषी माता कोण ?
तिच्याच उपवासात मी उपाशी होते हे विसरत होते
अहो मी फक्त कार्ड देईन
सरकार तुम्हाला राशन देईल
तो म्हणाला, पण ती म्हणाली पतिव्रतेची बाजारबसवी
ही बिनसरकारी पदवी
कोण काढून घेईल ? विचारा तुमची इन्कोरी.
आपल नांव ?
माता, भार्या, भगनन्निनो !

हे झालं सोशलवर्करचं तुम्हाला दिलेलं नामकरण
हवं मला आईवडिलांनी ठेवलेलं नामकरण
आयवडलांनी सुशा ठेवला समाजानं वेश्या ठेवलं
वय ?
धंद्यांचं, गालफड नि धंदा न बसलेलं
सेक्स ?
म्हंजे
स्त्री की पुरुष ?
दिसत नसलं तर हात लावून बघ,
ठीक, व्यवसाय ?
व्यावसाय म्हणजे व्हयवाट, एक खाट
त्यावर टेकायची उघडी पाठ,
मांड्या पसरुन वाहून घ्यायचा वीर्याचा पाट
धुण्यासाठी तो हाय पान्याचा माठ
अशी हाय ही वहिवाटीनं रगडल्याली पाऊलवाट
तिच्यावरुन वाहून न्यायचा जनाजा पतिव्रतेचा
मंगलाष्टकं करतात सप्तपदी त्या मयता पाठोपाठ
ती म्हणाली करुन मान आपुली ताठ.
राहू द्या, एवढं सगळं लिहायला फॉर्मवर जागा नाही
आणि कुठं तरी ओरोजिनल म्हणून लिहायला
मी साहित्यिक सुद्धा नाही.
सांगा मला आता तुमच्या नवऱ्याचे नांव !
कुरकुरली गिऱ्हायकामुळे आतली खाट
ती कुरकुर उताविळ झाली होती
नवऱ्याच्या कण्हण्याचा रेडिओ सिलोन झाला होता

रोज कण्हत होता, रोज मरायची जाहिरात करीत होता
सांगा बाई नांव तुमच्या नवऱ्याचे
क्षणभर विसरून वहिवाट
अश्रू भिजवून गेले पाऊलवाट
मग म्हणाली ती पुन्हा मानेने ताठ
लिहून टाका की हो तुमचेच.

## जागेवाला बाबा

ती होती एक झोपडपट्टी,
आडवी तिडवी आणि हट्टी,
इच्छा नसून वाढत होती
अंगावरच्या शिवलासारखी.
होती ती बरीच नकटी,
स्कायस्क्रेपरपरीस नाक उडवून,
पेन्टेड फाऊंडेशनची रंगरंगोटी
नसलेली
एअर कंडीशनची थंडी,
हायक्लास सोसायटीची सोफिस्टिकेटेड अंडी
न उबवणारी.
कुठेही मुतणारी हगणारी,
भोकातून वितळणारा सूर्य अंगावर घेऊन विणारी,
संसार फुललेला एकेकाचा.
न झेपताही, ट्रान्सिस्टरवरच्या झायरातीची
आश्वासन गिळून, व्हिमसे धूलाई न करता
दगडावर कर्म नि कपडे आपटता
एकाला खेटून दुसरी झोपडी, सखी शेजारीणी,
तू हसत रहा,
हास्यात दारीद्र्य गुंफित रहा.
जागेवाला बाबा करतो रक्षण
वेचतो आपल्या आयुष्याचे क्षण

त्याच्याच कृपेने रहाती हे संतजन
बिस्मिल्ला करोनी
ओम् हरी ओम् म्हणोनी
झोपती, जागेवाल्याला राखण करीत ठेवोनी
तो म्हणे रावंड घेतो
पल्याडच्या मानतोड्याला तिथंच रोखतो
आयसफोटवाल्याच्या पोराचा वाढलेला ताप
हा बापाच्या मायेने उतरवतो साफ.
रात्रीची पखरण झोपड्यावर चांदण्याची
त्यात मिसळते माया जागेवाल्याची
रात्रभर जागून फर्स्ट ट्रेन येताच वेळ त्याची आरामाची
झोपड्यांच्या कामांची, आंघुलीपांघुलीची
जो तो निघतो त्याला जागेवाल्याची साक्ष
पावलं वळतात जागेवाल्या बाबाच्या मंदिराकडे
मग ज्याची त्याची पावलं निघणारी
गाठू पहाती जिनगानीची मक्का मदीना, गुरुद्वारा पंढरी
पुन्हा रात्र, पुन्हा पहारा,
वर्षानुवर्षे जागेवल्या बाबाचा सहारा
एक दिवस उजाडतो होते कारवाई
सगळ्यांची उघड्यावर पडते आई
गाडगी घमेली चिंपाठ होती भुईसपाट
जागाही नाही लोकांना टेकायला भुईस पाठ
यहाँ हम महल बनायेंगे सपनोंका,
तोडो ये खच्चर ढेर झोपडोंका,
सर्व काही तोडले जाते

तुटते त्याचे जागेवाल्याशी नाते
मंदीर जागेवाल्या बाबाची उरते,
ते तोडतांना तोडणाऱ्याची जाम फाटते.
उरतात मग तोडलेले मोऱ्यांचे कठडे,
वेडेवाकडे, ज्यात करीत होते ते....
पायपलायनीच्या पाण्याने स्नान
उध्वस्त देखावा वाटते जणू कब्रस्तान.
जागेवाल्या बाबाला घातलेल्या चद्दरच्या फुलाची
घेतली जाते जान आवळून मान
जागेवाला बाबा........
तो म्हने करतो रक्षण
रावंड घेतो
पल्याडच्या मानतोड्याला तिथंच रोखतो
फर्स्ट ट्रेन येताच आराम करतो.
सुकलेली चद्दर अंगावर ओढून
स्वतःच्या आयुष्याचे कब्रस्तान पाहून
झोपी जातो वितळणाऱ्य सूर्याच्या साक्षीनं
अजूनही........
अजूनही.......
अजूनही.......

## सोन्याचा नारळ

लाटा आयल्या धक्का मारावला
मिनी हांगल पोराला घट पकर मना
तारु घाबरुनशी लागलं थरथर कापावला
अैसा कैसा भारन्या देव चिरला
सोन्याचा नारल नं नारली पुनवेला व्हावला
रामचंदरची पकर ढिली झायली
तवा त्येला मिनीच मिठी मारीली
आकाश रडावला लागलं चंद्राबायच्या डोळ्यामनी
दर्याव झायला अंधार
कंदीलपन हारला तुफानाला
कवार जावाच कैसे जगावच
तारु नि रामचंदर कैसं किनाऱ्यावर नेवाच ?
घनी मोठी लाट तेन वक्ता दिसली !
मी खंबाल्या देवाचं नाव घेताच नमली
आयच्यात हांगिते खोटा कला बोल्ठ.
बोटीन पानी आयलं तवा पाय लागलं घसरावला
तवा हांगल पोराला, जा नि बस मशिनीच्या खोपटामनी
सोकरा माझा गेला आतमनी
लाटा परत आयल्या, तारुला वाकऱ्या तिकऱ्या करावला
कवरा येल झायला दर्याच्या नि माझ्या झगऱ्याला
खबर नय मना
मिना रामचंदरला हाक मारीली

त्याने ओ नाय दिलं
सुसाट वाऱ्यानं ऐकू नाय आलं.
मिनी मशिन रुम पायली
माझा रामचंदर तय नवता
चंद्राबायला फुटते पान्हा
रामचंदरची याद येऊनशी, बारा वरसांनी
वादळ गरस्तांना मदत करीते गोव्हमेन्ट
कवरे रूपिये ! एक हजार.
आयची ! काय कराचं हे पैसं.
रामचंदर गेला समुद्राचे पोटामनी
तो परतेल ते वक्ता आनेल सोन्याचा नारळ
भारन्या देवाच्या हातामिनसी हिसकावून
हजार रुपये आता मी समिंदरला वावेल
त्या बदली तो रामचंदरला तरी पाटवेल

# इतिहास आणि अश्वत्थामा

इतिहासाचं मढं विसावलं
आराम करून आळसावलं
म्हटलं फिरावं नि पाय मोकळे करावे
इतिहास आला रस्त्यावर
दुधाची लाईन बघून डोक नाही राहिलं ठिकाणावर
गुप्तांच्या काळात दूधदुभत भरपूर
हे असं एकेक माजलेलं जनावरं
इथला दुध सेंटरचा मॅनेजर गुप्ते तर गेलाय कडकीवर
आर्यांच्या काळी सुख होते भरपूर
आता तर राक्षस उतलेत मातलेत
घेतला वसा कवटाळून बसलेत
पूर्वी सोन्याचा धूर निघत होता
त्या धुराने इतिहास खोकत होता
फुललेलं होतं सिंधूचं खोरं
आता तर उठवल सिंधू उभ्या आहेत
गंगा सिंधू सरस्वती व यमुना गोदावरी नर्मदा
या सदा मंगलम नदयांनी ओलावलेले प्रदेश
त्यात टिपटिप दातृत्व नळराजाचं
लटांबर नि जर्मनची टोपं, घागरी डबे घेऊय कटीवरी
दमलेल्या दमयंती उभ्या, निस्ती झुंबड, झिंज्या उपट,
नेसणात हात घाली नि पासली पाडी
इतिहासाच्या त्या पाणीदार ओलावलेल्या स्मृति

त्यांना लागली गळती पावसापरी नेत्रातून
बिहारमे अकाल नदीमें बाढ खेळके मैदानसे
मद्रासमें मेले (?) विदेश समाचार इतिहासाला मिळाले
फिल्म डिव्हिजनसे
मायभूचा उज्ज्वल इतिहास, प्रकाशमान, दैदिप्यमान
त्यावर जळताहेत कंदिल झोपड्यांच्या मनचे
त्यांची काजळमाया काळोख काढत्येय वर्तमानाच्या
तडकलेल्या काचेला.
महाभारत, रामायण, वेद, गीता, ऋचा
आठवून शहारली इतिहासाची त्वचा
हा वर्तमानाचा ढाँचा
जीवनाचा सांगाडा, वेल ऑफ डेथ
इतिहास फटफटीवरुन गरगरला स्ट्रेट
गटाराच्या बाजूचा भाजीपाव, मलई, आईसक्रीम
त्या पत्रावळी चाटणारे कुत्रे नि भिकारी
कविवर " निराला " च्या आठवणीचे ढेकर देत होते
त्या भिकाऱ्यांच्या गर्दीत उभा एक भिकारी
भाजीपाववाल्याच्या गोड्या तेलाच्या बाटलीकडे पहात होता.
चेहरा उडालेला होता पण नक्शा मात्र ओळखीचा होता
इतिहासाला तो चेहरा आठवला, पण सन मात्र विसरला
कारण तो इतिहास होता
अरे हा तर अश्वत्थामा
व्यथा त्याची काय ? तर असेल, इतिहास पॉवरफुल
महाभारत सांगत असेल स्टोरी, फाइव्ह व्हाइस
ॲन्ड व्हन्ड्रेड ॲन्ड वन फूलस्

पण ते पुस्तक छापणारा प्रकाशक
देत नव्हता त्याला तेल, घरावरून हाकलत होता.
इतिहासाने पाहिली डोक्यावरची अश्वत्थाम्याच्या
तडकलेली चिघळलेली वर्तमानाची जखम
वैतागून इतिहास गेला आणि....
डोक्यावर थापून तेल, झोपला
वर्तमानाचं मढं झाला
इतिहास झाला.

## आता मिटू दे पापणी

लेकरा आता मिटू दे पापणी
सूर्य गेला चालत पायी अनवाणी
नको विचारू प्रश्न भाबडा पुन्हापुन्हा
डोळयाला रे फुटतो पान्हा
अंगाई मी पुरूषी गाई बाळा तू माझा तान्हा
होऊनी तुझी मी मायमाऊली
जळत्या रात्री तुजसाठी
शोधतो मी आभाळाची साऊली
आईची अंगाई पडता कानी
अंगाईची पण मिटे पापणी
कशी यावी या आक्रोशणाऱ्या स्वराला
मऊ मखमली काळीजमाया अंगाईच्या सुराला
सूरही ओघळती भिडवतांना तुझ्या डोळ्याना डोळा
नको विचारू, लेकरा प्रश्न भाबडा किती वेळा.
आई कुठाय माझी ?
वरती बघ दिसेल तुजला देवबाप्पाचं शेत
चंद्र सूर्याचे बैल घेऊन करी नांगरणी
फुलते मग शिवार त्याला पिकं चांदणी
त्या चांदण्याची गेली कराया कापणी
तुझी आई
लेकरा आता तरी मिटू दे पापणी

२३२२२ का१०२६
धा. क्र. २१९२९

## एका पोस्टमनला......

एका पोस्टमनला तार आली
" तुझी आई वारली "

एक खूनी - बंबखान्याजवळ उभा
फ्युरीअस –
पांच रूपयेसें कोथळा –
सुपारी दिली कि बास –
कितीही किलोचा कोथळा - रेट तोच. उधारी नाय
त्या खुन्याच्या पोटात पेटली आग
त्या आगीत त्याचा कोथळा वळवळू लागला
भुकेनं कळवळू लागला
मेंदूची घंटा ठणाठणा वाजून
मनाचा बंब सैरावैरा धावू लागला
स्वतःच्याच नांवनं सुपारी घेऊन
स्वतःचाच कोथळा पांच रुपयात काढायला तो तयार होता
बंब म्हणाला ब्रिगेडिअर, सांभाळा गळणारी पॅन्ट
आतापर्यंत पुष्कळ फुटकळ आगी विझवल्या
आताची आग मेजर
वीस माळयाच्या बिल्डींगला लागल्यासारखी
ही विझवलीच पाहिजे. संभाळ खपाटीमुळे पुन्हा सरकलेली पॅन्ट
समोर आहे रंगाचा कारखाना
वेळ आहे पाळी सुटतानाचा
रंग कामगारांचा विटलेल्या घरी परतण्याचा
तुझ्या धंद्याचा
खुनी घाबरला

चोख टरकला
सुपारी घेणे नि खून करणे म्हणजे जिगर होती
पोटासाठी कुणाचे पोट फाडणे म्हणजे आता पाप होते
बेंब म्हणाला पाप्याने पापाचा विचार करु नये
पुण्याला उगाचच चुकल्याचुकल्यासारखे वाटेल.
खुनी पुढे झाला.
कामगारांचा एक जथ्था निघून गेला
खुन्याने साहस केले नाही.
भूक तर पोटात मोर्चा काढून फिरत होती
लेते रहेंगे लेते रहेंगे दानापानी लेते रहेंगे
हमसे जो टकरायेगा मिट्टीमे मिल जायेगा.
एक कामगार उशिरा आला बाहेर
उगाचच रेंगाळत राहिलेल्या आयुष्यासारखा
तो पुढ आला
खुनी पुढं झाला.
त्याने चाकू दाखवला
रंगाच्या फॅक्टरीतल्या कामगाराने बॅनर दाखवला
फॅक्टरीतल्या रंगाने रंगवलेला
साक्षरता प्रमार करू नकोस खुनी वदला
ह्या आमच्या मागण्या लेते रहेंगे लेते रहेंगे
कामगार बळेच हसून म्हणाला
हसताना चमकलेल्या दातांना दिसलं चकाकतं पातं
त्याचवेळी त्याला कळलं मृत्युशी आपलं नातं
—मला मारून तुला काय मिळणार ?
—पैसे.

—पैशानी काय होणार ?
—भुकेचा मोर्चा तुटणार. फाटाफूट होणार.
—माझं पोट फाडून आंत तुला भूकच दिसणार.
—पाहू दे ती भूक, आयच्यान तिचा थोबडा पाह्यला नाय मी
—मग पहाच तिचं भेसूर रुप, तुझं होईल समाधान खूप
आणि माझंही, असमाधानी आयुष्य संपल्याच.
—खालीपिली शास्त्राची समझी देऊ नको.
—खुन्यानं चाकू खुपसला त्याच्या पोटात
क्षणात कोथळा आला खुन्याच्या हातात.
—बरीच आतडी हायत तवाच पिळवटून बोलत व्हता.
खुन्यानं मग स्वतःच पाहिलं शरीर.
रंगाच्या फॅक्टरीतल्या कामगाराच्या अंगातून उडालेलं रक्त
रंगीबेरंगी होतं.
अनेक छटा होत्या. त्यानं त्याचं अंग थबथबलं होतं.
आयला अनेक रंगाचं रगात !
म्हायत नव्हत भूकेचं रूप
दावलं पाह्यजे हये आपल्या नियतीला
अनेक रंगाच्या रक्ताने थबथबलेला तो खुनी
मग आपल्या नियतीपुढे मानखाली घालूनी
उभा राहुनी वदला –
बघ नियती माझ्या हातून काय प्रकार झाला
नियती वदली खुन्याला
बाळा ! इंद्रधनुष्यात लोळायची तुझी संवय
अजूनं मोडली नाही वाटतं !

घनशाम, सुंदर श्रीधरा अरूणोदय झाला
उठा लष्करी भडव्याहो। भोंगा वाजायचा समय झाला
कायमील पगार झाला मिळचा जर खाडा
उठा ! या मंगल समयी, पहा पहा ते निर्गगचित्र
बालकविच्या डोळ्यातून
बेस्टची बस पयली, गायली घर्रघर्रची भूपाळी
तिची गोष्टच वायली
पहा बघा सुंदर नारी
" संडास "मार्जन करी
तिच्या काठेवाडी कबुतरांची शानच न्यारी.
ती बघा गुरे निघालीत, महिनाभर चरण्यांची खंत
बंदिस्त शहरात गावच्या आठवणींचे करीत रवंथ
पहाट वारा मंजुळ प्यारा,
श्वासून व्हा दंग
भरा छातीत केमिकल फॅक्टरीचा गंध.
बासरीचे गोड सूर ऐका
इराण्याच्या रेस्टॉरंटमधून
पानीकम च्याय ढोसा, धारोष्ण दूध समजून
शेतकरी जातोय शेतावर कामावर कामाला
स्वतः बैल होऊन साच्याला जुंपायला
मात्र येणार न्हाई घरधनीन दुपारी
घेऊन न्याहारी,

फुलायची न्हाई हाक तिची आयुष्याच्या शिवारी
राहिले दूर घर माझे जिवलगा
ही रोजची टीर पिर आता बंद कर
घरधणिनींची आता आठव इसर
ती एक बाय होती तुझ्याशी लगीन लावलेली
विधवेची सप्तपदी करून राहल्येय ती
गावी मनीऑर्डरची वाट बघत
म्हणून म्हनतो उठ, कामावर जा. रोजी कमव
गेट बंद झाला होईल खाडा
तुझा आणि मनीऑर्डरचा
तुझी विधवा जगवण्यासाठी मिलमध्ये मर मरा
घनश्याम सुंदर श्रीधरा
भोंगा कोकलतोय थकलेली झोप आवरा
कारण—
भोंगा लयच आगाव असतो
त्याला कुंकवाचा ठाव माहित नसतो

# शोकदिन

येता मरण थोर नेत्याला
अ ग्रेट लॉस....
अतिनष्ट दिवस या देशाला
हर्ष मरे, उत्कर्ष सरेना, सकळां आली प्रेतकळा
बंद जाहला रेडिओ सगळा, सारंगी काढीते गळा
शोक संदेशा मधुनी कळला शोक जगाचा कळवळला
ध्वजराष्ट्राचा वरूनी खाली अर्ध्यावरती उतरवला
जालीयनवाला बागेतल्या गोळ्यांची भोकं
त्यांच्या रक्ताळलेल्या आठवणी अजुनी नाही बुझल्या
परदेशी मालाच्या स्वदेशी आगी नाही विझल्या
अजुनी पाहता बंध मानेचा गोमातेचा
अश्रू ओघळ नाही सरला भगतमातेचा
क्रांतिकारकांना देऊन फाशी जगलेले मांग
स्वतंत्र सूर्याला पाहून चेहरे लपवितात काय ते घुबडा सांग
स्वातंत्र्याची पंचशीली वर्षे
योजनांची पंचम वर्षे
वर्षानुवर्षे अबाधित ठेवायचय स्वातंत्र्य
त्या स्वातंत्र्यातला आजचा हा शोकदिन
सर्व कांही बंद झालं
सरकारी, निमसरकारी पब्लीक परतलं घरी
रस्त्यांवर गर्दी वाढली
भेळपुरीची विक्री वाढली

भरून राहिली हॉटेले, तावावर ताव
कुल्फीला तर सोन्याचा भाव
रेडिओ नाही, टी. व्ही. नाही
करा गर्दी नाटकाला
सिनेमाच्या अंधारात विसरा देशाच्या दुःखाला
अरे आज तर दारूची दुकाने उघडी
उद्या सेकन्ड सॅटर डे
प्या व्हिस्की, हॅंग ओव्हरची भीती नाही
आहे हक्काचा सन्डे
रिकाम्या बाटलीत भरा राष्ट्राचे दुःख
आठवलंच तर गांधीचे हरे राम
मेला पण रजा देऊन गेला हीच भावना,
राष्ट्रभावनेची उडलीय दैना
आज पब्लीक रस्त्यावर फिरतंय
एन्टरटेनमेंट नाही म्हणून कंटाळलय.
त्याच गर्दीत फिरताहेत उघड माथ्याने
क्रांतिकारकांना फाशी देणारी दिवाभित
घुबडं आज बसतील थाटाने राजघाटावर,
अर्ध्यावरचा तिरंगा पाहून घुत्कारतील
सरफरोशीकी तमन्ना आज हमारे दिलमें है
या गीतातून अश्रू ओघळतील
त्या अश्रूंच्या पाण्याने,
फिर फिर फिरून ऌन्टरटेन झालेल्या दिवाभितांनो !
शमवा आपली तहान

भूतलावर पाहिलं उमललेलं फूल
म्हणजे ते मनुचं मूल
त्याची हँ हँ टँ हँ ऐकून काय झालं ?
भूमातेने पहिलटकरणीसारखा निश्वास सोडला
त्या श्वासाला होता सुगंध तृप्तीचा
तो निश्वास रानारानातून सळसळला
आणि झाडांच्या अंगावर राहिले उभे रोमांच
अजूनही तो निश्वास दरवळतोय आंब्याच्या मोहरातून
नि रोमाचं उभे आहेत काटेरी बाभळीतून

## सूर्य तापून राहीलाय

सूर्य तापून राहीलाय्....
दूसरा धंदाही क्या उसको !
त्याले थोडीच पडून राहिलीय सायकल रीक्शा चालवायची !
सकाळी उगवतो नि संध्याकाळचा चालला जातो
पर दिवसभर रिक्शावाल्यांचे पाय भुनुन राहत असतो
मनून तर वैलावर चाँदतारे भुनुन भुकेचा सूर्य ठंडा करता येतो
यंदाले फारच गयम होऊन राहीलय
शहारतली चढाईपर फारच वाढलीय
लोकाईचे धड पन वजनदार झालेत
पेडल मारूनमारून पाय लेकाचे आंबू लागलेत
रस्ता संपतच नाई
शरीराचा घोडा भागत नाई
तो बसला तर उठणार नाई
रेस नाई जिंकला तर कुनी गोळीही मारणार नाई
गोळयाईची किंमतच लई.
सोताले मानूस मवून जगवणारा घोडा व्हाहा
आणि मुकाट गाढवांची बोझी वाहा
आपुन कायले उतरून राह्यले !
बैठो, बैठो
भाजलेले पाय बघुन तुमच्या मनाले चटके बसले.
या फुकाव्यात ही मानुसकी म्हंजे बरफका गोला
मीठा मीठा लाल हरा....अजाबच

पॅक अप. आणखी काही
टंचाई
तेल नाही तुप नाही दवा नाही दारू (आहे)
कपडे नाही, रोटी नाही, लग्नाची बेटी आहे
रोग आहे रोगी आहे इस्पीतळ आहे पण कॉट नाही
चोरी आहे खून आहे दरोडा आहे बँक आहे
पण भरायला पैसे नाही
बस बस बस किट बँग भरायला लागली
आणखी थोडीशी जागा आहे
भर त्यात तुझी ट्रबल उरली सुरली
भरायची आहे माणुसकी पण ती जगात शिल्लक नाही
पॅक अप. बंद कर बँग आणि उचल
फारच जड झालीय रे उचलवत नाही
म्हणून....
पॅक युअर किट बँग अॅन्ड नुसता लाफत रहा
लाफ लाफ लाफ

REFBK-0021929
REFBK-0021929
२३२२
२१९२९